शनिवार दि.१९ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ४५
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक
बीड
लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्या:खा.उदयनराजे भोसले यांचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सातारा (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या पाच दशकांमध्ये शरद पवार यांच्यासारखे दिग्गज नेते होते. मात्र त्यांनी मराठा आरक्षणासह पश्चिम महाराष्ट्राच्या सिंचन योजना लटकत ठेवल्या. त्यांनी स्वतःचे महत्त्व वाढवण्यासाठी इतरांना वंचित ठेवण्याचे काम केले. गेल्या पाच वर्षांमध्ये महाराष्ट्रात विकासाची जी फळे आहेत ती महायुती सरकारमुळे दिसत आहेत. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीतही महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी मतदार राजाने जिल्ह्यातील महायुतीच्या सर्व उमेदवारांना निवडून द्यावे, असे आवाहन खासदार उदयनराजे भोसले यांनी केले. भारतीय जनता पार्टीच्या वतीने येथील लेक व्हयू हॉटेलमध्ये आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. यावेळी सातारा-जावळी या दोन तालुक्यातील बहुसंख्य पदाधिकारी उपस्थित होते. त्यावेळी खासदार उदयनराजे भोसले बोलत होते. व्यासपीठावर महाराष्ट्राचे प्रभारी अजय जामवाल, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, सुनील काटकर, अविनाश कदम, भरत पाटील, सौरभ शिंदे, रंजना रावत, निशांत पाटील, अशोक मोने, माजी सभापती वसंतराव मानकुमरे, ज्ञानदेव रांजणे इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



खा.उदयनराजे भोसले म्हणाले, काँग्रेसने गेल्या ५० वर्षांमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सांगितलेल्या सत्ता विकेंद्रीकरणाला मूठमाती देऊन घराणेशाही सुरू ठेवली आहे. महाराष्ट्राच्या विकासाचे निर्णय बरीच वर्ष प्रलंबित राहिले होते. यशवंतरावांच्या यशवंत विचारांचा विसर काँग्रेसला पडला असून जातीय तेढ निर्माण करण्याचे पाप काँग्रेसने केले आहे. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्यासारखे दिग्गज नेते असताना महाराष्ट्रातील सिंचनाचे रोजगाराचे शिवाय मराठा आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित राहिले. हे प्रश्न सोडवण्यासाठी पवार यांचा कोणी हात धरला होता का? त्यांच्यावर कोणाचे दडपण होतं का? असे बरेच प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात. शिवरायांचा जनकल्याणाचा सर्व समावेशक विचार केंद्रात भाजपने आणि राज्यात महायुती सरकारने अमलात आणला आहे. विरोधकांनी महाराष्ट्राला भूलथापा देण्यात आलेले काही केले नाही. त्यामुळे त्यांनी आरोप करताना स्वतः पहिले आत्मपरीक्षण करावे, अशी घणाघाती टोलेबाजी उदयनराजे यांनी केली. महायुतीच्या जिल्ह्यातील उमेदवारांना आपण भरभरून आशीर्वाद द्यावेत. जेणेकरून महाराष्ट्राची गेल्या पाच वर्षापासून ची प्रगती यापुढेही अखंड सुरू राहील. याकरिता महायुतीचे उमेदवार कसे निवडून येतील याकडे लक्ष द्या, असे आवाहन उदयनराजे यांनी केले.आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले बोलताना म्हणाले, निवडणूका आल्या की विरोधक आमदारकीसाठी बाशिंग बांधून तयार असतात. मात्र गेल्या पाच वर्षात विकासाचा कोणताही ठोस कार्यक्रम त्यांनी राबवलेला नाही. सत्तेच्या प्रवाहात असतानाही काहींनी केवळ काही न करता आमदारकीसाठी आता दावा ठोकला आहे. मात्र गेल्या पाच वर्षात सातारा व जावली तालुक्यात महायुतीच्या माध्यमातून प्रचंड विकास कामे झाली आहेत.

# चार्टर्ड अकाउंटंट श्री.चेतन टाक आणि सामाजिक बांधिलकी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**राकेश साळवी | मीरा भाईंदर**

मीरा भाईंदर येतील नामांकित आणि प्रसिद्धी असे चार्टर्ड अकाउंटंट ज्यांना विविध समाज आणि संस्थेकडून सन्मानित केले गेलेले तसेच सामाजिक बांधिलकी जोपासणारे श्री. चेतन टाक यांच्याशी इन्कम टॅक्स या विषयावर चर्चा करताना ते म्हणाले प्रत्येक नागरिकांनी इन्कम टॅक्स फाईल रिटर्न करणे गरजेचे आहे. आपले इन्कम जास्त असो अथवा कमी परंतु फाईल रिटर्न करणे गरजेचे आहे आहे त्याच बरोबर आपले कर्तव्य देखील आहे त्यासाठी कोणत्याही सी ए अथवा लेखापाल कडे जाण्याची गरज नाही तुम्ही स्वतः ऑनलाईन रिटर्न करू शकता. तुमचा व्यवहार मोठा असल्यास व्यवहाराचे नियोजन करायचे असल्यास तुम्हाला मार्गदर्शन घेण्यासाठी सी ए ची आवश्यकता पडू शकते. तुम्ही इन्कम टॅक्स जरी भरत असलात तरी सरकार तितकेच तुम्हाला त्याचे फायदे




मिळऊन देते. जे लोक फाईल रिटर्न करण्यास टाळाटाळ करतात त्यांना नंतर अडचणीना सामोरे जावे लागते. इन्कम टॅक्स फाईल रिटर्न करण्यात घाबरण्या सारखी काहीही गोष्ट नाही.आज ए आय च्या युगात सर्व काही सोप्प आणि जलद झाल आहे ज्यात तुमचा रिपोर्ट एका क्लिक ने मिळतो. आमच्याकडे बरीच कंपनी आणि अधिकारी रिपोर्ट ची मागणी करत असतात आम्ही त्यांना ए आय च्या साहाय्याने त्वरित उपलब्ध करून देतो. सध्या भारत सरकार द्वारा तुमच्या साठी बऱ्याच कर्ज योजना उपलब्ध आहेत त्याचा उपयोग करून घ्यावा. लोक फक्त कर्ज काढण्यापूर्ती इन्कम टॅक्स फाईल रिटर्न करतात अस न करता दर वर्षी नियमित फाईल रिटर्न करावी. आणि योग्य मार्गदर्शन आणि मदती साठी सी ए कडे संपर्क साधावा. इन्कम टॅक्स बद्दल बोलत असताना ते म्हणाले एक नागरिक या नात्याने आपली काही जबाबदारी आहे. श्री. चेतन टक हे लेडी गोल्ड ट्रस्ट मिशन या सामाजिक सेवा संघाचे सभासद आहेत आणि त्यांच्या या ट्रस्ट ने उत्तर प्रदेशातील बरेली शेजारी असलेले हरचंदपुर सारख्या लहान गावाला दत्तक घेतले आहे. ट्रस्टच्या माध्यमातून ते गावातील लोकांना लागणाऱ्या गरजेच्या वस्तूं पुरवतात. उदा. चादर, राशन, पावसाळ्यात लागनाऱ्या उपयोगी वस्तू , ब्लँकेट. रोजच्या जीवनात उपयोगात येणाऱ्या वस्तू, शैक्षणिक वस्तू, औषधे , मुलांच्या खेळण्याचे साहित्य आणि बरच काही. या सर्व गोष्टींच्या मागील उद्देश स्पष्ट करताना ते म्हणाले आपण या समाजाचे काहीतरी देणं बनतो. आपण एका ठराविक यशा परियंत पोचल्यावर आपली नागरिक म्हणून एक जबाबदारी बनते. आपल्याला जेवढं शक्य आहे त्या परीने आपण समज्याची मदत करावी. या कार्यात त्यांना आनंद ही मिळतो. त्यांच्या पत्नी सौ. शीला टाक ह्या देखील कार्यात सहभागी असतात, त्या देखील स्वतः सी ए आहेत.

# महर्षी वाल्मिकी जयंती निमित्त लोणार शहरात भव्य मिरवणूक



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार | विनायक कुटे**

महर्षी वाल्मिकी यांच्या जयंती निमित्त लोणार शहरा मध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य अशी जयंती साजरी करण्यात आली.शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली . शहरातून मुख्य रस्त्यावरून हि मिरवणूक काढण्यात आली यावेळी शहरातील चौकाचौकात सर्व पक्षीय तसेच सर्व समाज बांधवांनी उपस्थिती दर्शविली महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या जयंती मध्ये सर्व समाज बांधवांनी उपस्थिती दर्शवली महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले . शहरात ठिकठिकाणी अल्पोपहार चहा पाणी देत स्वागत करण्यात आले शहरातुन शांततेत मिरवणूक पार पडली या मिरवणुकीत कोळि महासंघाचे पवन नेवरे ,गौतम भाई गवई युवा तालुकाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी, , संदेश मोरे वंचित शहर उपाध्यक्ष सचिन नेवरे , शितल कुमार नेवरे,अभय मोरे सर्जेराव मोरे वंचित शहर सचिव विकास मादनकर मंगेश सरदार आकाश मोरे अक्षय जाधव अजय बछिरे.समाधान साळवे रोशन अंभोरे जितेश अंभोरे विश्वास मोरे, विराट मोरे, कोळी समाज बांधव व सर्व समाज बांधव उपस्थित होते.

# महानगर पालिका आयुक्तांना निवेदन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली | संतोष कदम**

वाघोलीकरांना दैनंदिन जीवन जगत असताना विविध प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे , त्याच अनुषंगाने वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निवेदन देण्यात आले.
वाघोलीतील वेगवेगळ्या समस्या सोडवण्यासाठी वाघोली स्मशान भूमीतील लाईट, पीएमटी बस स्टॉप समोरील कचरा ,वाघेश्वर मंदिर ते लोहगाव चौकापर्यंत चा रस्ता केसनंद रोड ची समस्या वाघेश्वर नगर मधील लाईटचे काम या सर्व मागण्या पूर्ण करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त संजय पोळ सर यांच्या कार्यालयास भेट देऊन निवेदन देण्यात आले त्यावेळी संदीप भाऊ मोरे अध्यक्ष प्रभाग क्रमांक चार वंचित बहुजन आघाडी उपाध्यक्ष शरद कांबळे संकेत सोनवणे शाखा अध्यक्ष अभी भैरट राजू बोर्डे हे उपस्थित होते.

# सौ.अपर्णा संविधान दुगाने यूजीसी नेट परीक्षा उत्तीर्ण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**बिलोली | गौतम गावंडे**

इंडियन पँथर सेना प्रमुख संविधान दुगाने यांच्या पत्नी सौ. अपर्णा संविधान दुगाने ह्या नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल टेस्ट एजन्सी मार्फत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार घेण्यात आलेल्या सहाय्यक प्राध्यापक पदासाठीच्या शिक्षणशास्त्र या विषयात नेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आहेत.
मुळात ही परीक्षा अतिशय कठीण असून एकूण परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ जवळपास सहा टक्के विद्यार्थ्यांना पात्र ठरविले जाते. यापुर्वी ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या सेट परीक्षेतून सुद्धा सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पात्र झाल्या असून सध्या त्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा मध्ये विद्यावाचस्पती अर्थात पीएच.डी करत आहेत. त्यांच्या या तिहेरी यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत



आहे.
त्यांचे पीएच.डी चे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. केशव इंगोले सर, प्रो. डॉ. बलभीम वाघमारे, माजी सरपंच शिवाजी वाघमारे, बडुर गावच्या सरपंच सौ. चेतना मोहन जाधव, सासरे भीमराव गंगाराम दुगाने, प्राचार्य हेमंत दुगाने पत्रकार बांधव, सामाजिक, शैक्षणिक व राजकिय क्षेत्रातील पुढारी, नातेवाईक तसेच मित्रमंडळीनी या यशाबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेकापूर येथील कै.दगडोबा गोविंदा पा. केंद्रे यांचे दु:खद निधन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | प्रतिनिधी**

कंधार तालुक्यातील शेकापूर येथील कै.दगडोबा गोविंदा पा.केंद्रे वय ८५ वर्ष रा.शेकापूर पो.शेकापूर ता. कंधार यांचे वृद्धापकाळाने दि.१७/१०/२०२४ रोज गुरुवारी रात्री ठिक ८:३० वाजता दु:खद निधन झाले आहे.त्यांच्या पश्च्यात एक मुलगा,तिन मुली,सून,जावई ,नातू,पणतू असा मोठा परिवार आहे.अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ तालुका कंधारचे कार्याध्यक्ष तथा जि प्रा शा सोनमाळ तांडा मुख्याध्यापक पिराजी केंद्रे यांचे वडिल आहेत.त्यांचा अंत्यविधी दि.१८/१०/२०२४ रोजी दुपारी ठिक १२:०० वाजता शेकापूर येथे पारपडली आहे. अंत्यविधीसाठी राजकीय पक्षाचे कार्यकर्ते व शिक्षण विभागातील अधिकारी, पदाधिकारी, शिक्षक,सर्व क्षत्राती कर्मचारी आणि मित्र परिवार,नतलग व गांवकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**झाडे लावा झाडे जगवा**



## चारोळी

दुसऱ्याशी तुलना करुनी
सुख कधीच मिळत नसते
खरे सुख ज्याच्या त्याच्या
विचारांच्या चकोरीत दडलेले असते.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# दिपक वजाळे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज | प्रतिनिधी**

दि.१७ केज तहसील कार्यालय येथे निवडणुक निर्णय अधिकारी दिपक वजाळे सर यांच्या आध्यक्षतेखाली आदर्श आचार संहिता आमलबजावणी अनुषंगाने आढावा बैठक दुपारी ०३;०० वाजता घेण्यात आली. बैठकी मध्ये विविध प्रश्नावर सांगोपांग चर्चा करण्यात आली.२३२ केज विधानसभा मतदार संघ निववडणुक कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे आदर्श आचार संहिता पालन काटेकोर पणे करण्यात यावे या साठी सर्व पत्रकार ,संपादक,इलेक्ट्रॉनिक मिडिया,,प्रिंट मिडिया यांच्या माध्यामातुन प्रसिध्दी करण्यासाठी सर्वांना प्रेस नोट द्वारे कळवण्यात आले होते.सर्व जणांची उपस्थिती लाभली.केज तालुक्यात एकुण ४२० बुथ केंद्र आसुन या सर्व बुथावर दिव्यांग व्यक्ती,वयोवृध्द , महिला मतदार यांची गैरसोय होउ नये म्हणुन शासन सर्वोपरी उपाययोजना आखत आहे. काही बुथ केंद्र संवेदन,अतिसंवेदनशील आसुन त्या ठिकाणी काही गैरप्रकार घडतो का याची दक्षता घेऊन त्वरीत संपर्क आमच्याशी ,तहसीलदार साहेब यांच्याशी संपर्क साधावा असे आव्हान दिपक वजाळे सर निवडणुक निर्णय अधिकारी यांनी केले आहे. या बैठकीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अंबाजोगाई ,प्रियंका टोगणे,रावसाहेब सर,केज तहसीलदार श्री राकेश गिड्डे ,नन्वरे सर, सर्व कर्मचारी आणि बहुसंख्य पत्रकार बंधव उपस्थीत होते.



# भटक्या-विमुक्त मागासवर्गीय समाजाचा महा मेळाव्याच्या निमित्ताने मा.आ.धोंडेंना एकमुखी पाठीबा, भव्य रॅलीने आष्टी शहर दणाणले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

पुढच्या महिन्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी आ.भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघातील मागासवर्गीय आणि भटक्या विमुक्त जाती जमाती समाज बांधवांचा संवाद महामेळावा संपन्न झाला.मेळाव्याच्या निमित्ताने मा.आ.भिमराव धोंडे यांना एकमुखी पाठिंबा दिला.यावेळी झालेल्या प्रचंड रॅलीने आष्टी शहर दणाणले. आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघातील मागासवर्गीय आणि भटक्या विमुक्त जाती जमाती समाज बांधवांच्या संवाद महामेळाव्याचे आष्टी येथे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे हे होते.संवाद मेळाव्याच्या निमित्ताने आष्टी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातून समाज बांधवाची भव्य रॅली काढण्यात आली.वेशीतून शनि चौक,किनारा चौकातून खडकत रस्त्याने भव्य रॅली लक्ष्मी लॉन मध्ये पोहोचली.

कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे,भाजपा तालुकाध्यक्ष साहेबराव म्हस्के, ड.रत्नदिप निकाळजे,युवा नेते अभयराजे धोंडे,जि.प.सदस्या वर्षा माळी,हरिभाऊ जंजिरे, माजी जि.प.सदस्य अशोक सव्वाशे,अशोक खोले, दिलीपराव म्हस्के,माजी सरपंच बाळासाहेब पवार,भाजपा जिल्हा सरचिटणीस शंकरराव देशमुख,संजय कांकरिया, महाराष्ट्र राज्य भटक्या विमुक्त संघटनेचे उपाध्यक्षा ड. भाग्यश्री ढाकणे,भाजपा किसान सभेचे अध्यक्ष बबनराव ओटे, युवराज सोनवणे,भटक्या विमुक्त विकास संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमंत धनवटे,उपाध्यक्ष गोवर्धन जाधव,पाटोदा तालुका उपाध्यक्ष नवनाथ विटकर,आष्टी तालुकाध्यक्ष अविनाश विटकर, पोपट धनवडे,एकलव्य संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पिंपळे,भाजपा तालूका उपाध्यक्ष रघुनाथ शिंदे,विकी शेकडे, शहराध्यक्ष बाबुराव कदम, चेअरमन राजेश धोंडे,सरपंच दादासाहेब जगताप,महाराष्ट्र केसरी






सईद चाऊस व इतरांची उपस्थिती होती. महामेळाव्यात बोलताना माजी आ.भीमराव धोंडे यांनी सांगितले की,मतदारसंघात सर्व जाती धर्माचे लोक राहतात. भटक्या विमुक्त व मागासवर्गीय समाजातील लोकांनी आपल्या मुलांना चांगले उच्च शिक्षण द्यावे.सर्वांगिण विकासासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. छत्रपती शिवाजी महाराज,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे,छत्रपती शाहु महाराज, महात्मा फुले यांच्या सारखे थोर महापुरुष अत्यंत कष्टातून पुढे येत त्यांनी देश आणि जागतिक पातळीवर नावलौकिक केले. आज समाजातील सर्व घटकांसाठी त्यांचे विचार प्रेरणादायी आहेत.गोरगरिबांनी चांगले शिक्षण घेतले तर त्यांना निश्चितच फायदा होईल. जागतिक पातळीवर आष्टीचे नावलौकिक करणाऱ्या धावपटू अविनाश साबळे यांचे त्यांनी उदाहरण दिले.अविनाश साबळेचा तरुणांनी आदर्श घ्यावा.कोणत्याही निवडणुकीत स्वाभिमान विकू नका,मागास घटकांसाठी शासनाच्या भरपूर योजना आहेत त्यांचा लाभ घ्या. शिक्षण घेताना गोरगरिबांना सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती मिळतात तसेच परदेशात जाण्यासाठी ही शिष्यवृत्ती मिळते,त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊन या योजनेचा लाभ घ्यायला पाहिजे म्हणजे गोरगरीबांचे विद्यार्थी उच्चशिक्षित होतील.भाजपाचे आष्टी तालुकाध्यक्ष साहेबराव म्हस्के यांनी सांगितले की,माजी आ. भीमराव धोंडे यांनी कधीही जातीयवाद केला नाही. २०१४ मध्ये भिमराव धोंडे आमदार असताना हजारों गोरगरिबांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवून दिला.तसेच मागच्या विधानसभेला व कालच्या लोकसभेला जवळच्या लोकांनी समोरून नाही तर पाठीमागून घात करीत पराभव केला.युवा नेते अजयदादा धोंडे यांनी सांगितले की,या निवडणुकीत धोंडे साहेब सर्व ताकदीनिशी उतरणार आहेत त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी आणि मतदारांनी साहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे.२०१४ ते २०१९ या काळात मतदारसंघाचा प्रचंड विकास केला आहे.ड.रत्नदीप निकाळजे यांनी सांगितले की माजी आ.भीमराव धोंडे म्हणजे विकासाभिमुख नेतृत्व आहेत मतदारसंघातील सर्व गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या विकासासाठी त्यांचा नेहमीच प्रयत्न असतो त्यामुळे तळागाळातील लोकांनी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी सांगितले की,मा.आ.भिमराव धोंडे यांनी कधी जातीपातीचे राजकारण केले नाही.मतदारसंघातील गोरगरीब जनता आणि तळागाळातील लोकांच्या विकासासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केले.त्यामुळे आज एवढ्या प्रचंड संख्येने समाज आला आहे.भिमराव धोंडे हे खरोखरच गोरगरीबांचे नेते आहेत.याप्रसंगी राजपाल शेंडगे,बालाजी भोसले, दीपक बोराडे,अनिल गजघाट, शंकरराव देशमुख,युवराज सोनवणे,अडागळे,सुनील शिंदे व इतरांची भाषणे झाली.

यावेळी आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील खंडू गिरी, बाबासाहेब ससाणे,बाबासाहेब शिरोळे,गौतम ससाणे,माजी सभापती अनिल जायभाय, सरपंच शशिकला चंदनशिव, माऊली कांबळे,जालिंदर पंडागळे,सुदाम वाघमारे,सुभाष कांबळे,ग्रा.पं.सदस्य आदेश निमोणकर,अभिलाष गाडेकर, बाळासाहेब शिरोळे,नानासाहेब डिडोळ,शंकर बर्डे,प्रविण देवडे, विलास जावळे,आस्ताकभाई शेख,आनंद जावळे,बापु वाल्हेकर,सर्जेराव वाघमारे, सर्जेराव तुपे,सनी काळपुंड, हमिद पठाण, विकास वनवे, छबुताई गायकवाड व इतरांची उपस्थिती होती.मेळाव्याला मतदारसंघातील महिला देखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मेळाव्याला मतदारसंघातील पारधी,भिल्ल,तिरमल,मातंग,महार,हरिजन,गोसावी,चांभार,वडार, कैकाडी व इतर जाती जमातीतील ग्रामस्थ आणि महिला उपस्थित होत्या.यावेळी सुमारे पाच हजारांहून अधिकचा जनसमुदाय उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश दिवटे यांनी केले.कार्यक्रम संपल्यानंतर चार चाकी बाहेर काढण्यासाठी खडकत रोडवरील लक्ष्मी लॉन ते आष्टी पर्यंत ट्रॅफिक जाम झाली होती एवढ्या मोठ्या प्रमाणात चारचाकी वाहने आली होती.

# भोसा जि.प. शाळा व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । प्रतिनिधी**

आज जि.प.प्रा.शाळा भोसा येथे अनिता शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली पालक सभा आयोजित केली. या पालक सभेतून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांची बिनविरोध निवडीने पुनर्गठन करण्यात आले.

अध्यक्ष म्हणून अनंतराव जाधव, तर उपाध्यक्ष म्हणून मुद्रिका जाधव आणि सदस्यांमध्ये प्रकाश जाधव, नितीन राऊत, प्रभाकर प्रधान, अर्चना गिरी, ज्योती भोसले, चांदणीबाई झोडपे, सुखदेव जाधव, गणेश जाधव- शिक्षण प्रेमी, दिपाली राऊत- ग्रामपंचायत प्रतिनिधी, पल्लवी पाटील- शिक्षक प्रतिनिधी

यांची बिनविरोध निवड करण्यात आली. समितीचे पदसिद्ध सचिव म्हणून शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश बिडगर यांची निवड करण्यात आली.

पालक सभेच्या यशस्वीतेसाठी पंढरी सुर्वे, तुकाराम भालेराव व सर्व पालकांचे सहकार्य लाभले. या पालक सभेचे सूत्रसंचालन शंकर भिसे तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापकांनी केले.

# शाळा व्यवस्थापण समितीच्या अध्यक्षपदी सौ वर्षा घाटूळ तर उपाध्यक्षपदी श्रीपती जाधव यांची बिनविरोध निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । प्रतिनिधी**



मानवत तालुक्यातील मौजे सावरगांव जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ मंगळवार रोजी सकाळी साडे दहा वाजता शालेय व्यवस्थापन समिती पुनर्गठन प्रक्रियेसाठी पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर सभेतून अध्यक्षा म्हणून सौ वर्षा राजेभाऊ घाटूळ तर उपाध्यक्षपदी श्रीपती प्रल्हादराव जाधव यांची सर्वानूमते बिनविरोध निवड करण्यात आली. तर सदस्य म्हणून सुधाकर वसंतराव घाटूळ, सौ शारदा ज्ञानोबा घाटूळ, मधुकर सोनबा सौदागर, नारायण सोपानराव जाधव, सौ प्रियंका गोविंद सातव, श्रीमती सीमा रवी एडके, संजय शेषराव घाटूळ, श्रीमती शामल ज्ञानेश्वर जाधव,सौ अहिल्या मुंजेबा मोगरे,विष्णू बालासाहेब घाटूळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

तसेच सचिव म्हणून यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मुरलीधर सिराळ, स्वीकृत ग्रामपंचायत सदस्य म्हणून सौ छाया धनंजय घाटूळ, शिक्षक प्रतिनिधी व्यंकट बोरगावे तर शिक्षण प्रेमी नागरिक म्हणून नारायण दत्तराव वाघमारे यांची निवड करण्यात आली. तसेच विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून यश अच्युतराव घाटूळ तर विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून कु.अमृता सतीश जोशी यांची निवड करण्यात आली. सदर पालक सभेस गावचे सरपंच गजाननराव घाटूळ, उपसरपंच संदीप जाधव, सर्व ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष उद्धवराव घाटूळ, चेअरमन माणिक सोन्नेकर, माजी सरपंच मुंजाभाऊ जाधव, शा.व्य.समिती माजी अध्यक्ष विष्णू घाटूळ, माजी उपाध्यक्ष रामेश्वर पांढरकर,सर्व माजी सदस्य, सावळी येथील युवा नेते विठ्ठल काळे तसेच शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व समितीचे सर्वांनी पुष्पहार घालून स्वागत केले. पालक सभेसाठी निरीक्षक म्हणून गट साधन केंद्र मानवतच्या वतीने सावरगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री ओमप्रकाश मुळे सर उपस्थित होते. शालेय व्यवस्थापन समिती पुनर्गठन प्रक्रियेसाठी शाळेचे मुख्याध्यापक मुरलीधर सिराळ सर, पदवीधर शिक्षक किशोर तुपसागर सर, ज्येष्ठ शिक्षक भाऊसाहेब चव्हाण सर, ज्ञानेश्वर जाधव सर, भानुदास ढाले सर,संतोष खामकर सर व व्यंकट बोरगावे सर यांनी परिश्रम घेतले.

## राज ठाकरे यांचा महायुती सरकारला इशारा

# निवडणुकीच्या तोंडावर टोलमाफी करायची अन् नंतर मागे घ्यायची असे चालणार नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बुधवारी मुंबईतील पाचही एन्ट्री पॉईंटवरील टोलनाक्यांवर हलक्या वाहनांना टोलमाफी देण्याच्या निर्णयाचे स्वागत केले. पण त्याचवेळी त्यांनी सरकारला निवडणुकीनंतर हा निर्णय रद्दबातल केल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील असा इशाराही दिला. सरकारचा टोलमाफी देण्याचा निर्णय स्वागतारार्ह आहे. पण सरकारने निवडणुकीनंतर हा निर्णय रद्द करण्याचा प्रयत्न करू नये. असे होणार नाही आणि मनसे तसे होऊही देणार नाही, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

राज ठाकरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेला संबोधित केले. त्यात त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने मुंबईतील पाचही एन्ट्री पॉईंटरवरील टोलनाक्यांवर हलक्या वाहनांना दिलेल्या टोलमाफीच्या सवलतीचे स्वागत केले. ते म्हणाले, राज्यात मनसेनेच सर्वप्रथम टोलमाफीची मागणी केली होती. या प्रकरणी जनतेची कशी फसवणूक होत आहे? हे आम्ही लोकांना पटवून दिले. यासाठी सातत्याने भूमिका मांडली. त्यानंतर आता मुंबईतील पाचही एन्ट्री पॉईंटवर टोलमाफी जाहीर झाली आहे. याविषयी मी सरकारचे अभिनंदन करतो व आभार मानतो. सरकारला उशिरा का होईना या गोष्टी समजल्या.सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर टोलमाफी देण्याचा निर्णय घेतला. निवडणुकीच्या तोंडावर टोलमाफी करायची आणि निवडणूक संपली की पुन्हा हा निर्णय मागे घ्यायचा असे चालणार नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेना असे होऊ देणार नाही. आम्ही ते खपवूनही घेणार नाही. त्यामुळे सरकारने अशी फसवणूक करण्याचा प्रयत्न करू नये. कारण यापूर्वी काही प्रकरणांत कायदेशीर गोष्टींचा दाखला देत अशा गोष्टी पुन्हा सुरू करण्यात आल्या होत्या.राज ठाकरे म्हणाले, सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे जनतेला समाधान आहे. आतापर्यंत किती पैसे येतात? किती जातात? हे कळायला काहीच मार्ग नव्हता. टोलनाक्याचा सर्व व्यवहार कॅशवर होता. त्यामुळे किती गाड्या गेल्या? कुणाच्या खिशात किती पैसे गेले? कुणाला किती पैसे मिळाले? हे कुणालाही समजत नव्हते. राजकीय पक्षही यावर गप्प होते. आता श्रेय घेण्यासाठी अनेकजण पुढे येतील. पण त्यांचा याच्याशी कोणताही संबंध नाही. हे आंदोलन कुणी केले? हे जगाला माहिती आहे. राज ठाकरेंनी एखादे आंदोलन हाती घेतले की काय होते हे या निर्णयातून स्पष्ट होते. सरकारला टोलमाफी द्यावी लागली आहे.राज ठाकरेंनी यावेळी लाडकी बहीण योजनेवरही टीका केली. ते म्हणाले, असे पैसे वाटून काहीच होणार नाही. आज तुम्ही जनतेला हजारो रुपये वाटत आहात. तुम्ही असे करूच शकत नाही. हे पैसे तुमच्या घरचे आहेत का? सरकारच्या तिजोरीत पैसे नाहीत आणि तुम्ही पैसे वाटत सुटले आहात. यापुढे तुम्हाला असे पैसे वाटता येणार नाहीत. अशाने राज्य कंगाल होऊन जाईल.विधानसभा निवडणुकीत राज्यात सर्वात जास्त जागांवर निवडून लढवेल, अशी घोषणाही राज ठाकरे यांनी यावेळी केली. आम्ही ही निवडणूक केवळ लढवायची म्हणून लढवत नाही. आम्हाला निवडणूक कशी लढवायची हे ठावूक आहे. आम्ही यापूर्वीही अशा निवडणुका लढवल्या आहेत. याविषयी आमचे दौरे लवकरच राज्यात सुरू होतील. या विधानसभेच्या निवडणुकीनंतर मनसे सत्तेत असेल. मनसे आपला जाहीरनामा लवकरच जाहीर करेल, असे राज ठाकरे म्हणाले.



# गेवराई येथील र.भ.अट्टल महाविद्यालयाचे नाव संस्कृती येवलेंनी केले गौरान्वित

## संस्कृती येवले याची राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनी परेड संचालनासाठी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

गेवराई येथील र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती येवले याची राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनी परेड संचालनासाठी निवड झाली आहे. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने परेड संचालनाचे आयोजित केले होते. कठोर परिश्रम आणि प्रखर इच्छाशक्तीच्या जोरावर संस्कृती येवले याला हे यश मिळाले आहे. या निवडीने सर्वत्र स्तरावर कौतुक होत आहे. नांदेड येथे प्रजासत्ताक दिनाच्या परेड संचालनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ स्तरावर हे शिबिर आयोजित केले होते. या प्रजासत्ताक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय निवड पूर्व चाचणी शिबिरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघात संस्कृती येवले यानी सहभाग नोंदवला होता. तसेच दि.१९ सप्टेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड शिबिरासाठी पूर्व निवड चाचणी आयोजित करण्यात आलेली होती. या पूर्व चाचणी मार्फत गेवराई येथील र.भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती येवले याची राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनी परेड संचालनासाठी निवड झाली आहे. २६ जानेवारी रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचालन शिबिरासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे परेड संचालनात निवड करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात दि.२३ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२४ दरम्यान या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड चाचणी शिबिरासाठी विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले होते. र.भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती येवले याची राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनी परेड संचालनासाठी निवड झाल्याने सर्वत्र स्तरावरून अभिनंदन केले जात आहे. या खडतर आणि कठीण स्पेर्धेमध्ये संस्कृती येवले यानी उल्लेखनीय यश मिळवले. त्याच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे विद्यापीठाचे व र.भ. अट्टल कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे नाव गौरान्वित झाले आहे. त्याच्या या यशासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य शिखरे मॅडम आणि सहकार्यानी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# कारेगावच्या सरपंचपदी वृषाली प्रशांत गवारे यांची बिनविरोध निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याच्या शिरुर तालुक्यातील मौजे कारेगावच्या सरपंच पदावर वृषाली प्रशांत गवारे यांची बिनविरोध निवड झाली आहे. पूर्वीच्या सरपंच निर्मला शुभम नवले यांनी राजीनामा दिला होता. त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या उपस्थितीत गवारे यांची निवड करण्यात आली आहे.

कारेगावच्या रिक्त झालेल्या सरपंच पदावर निर्मला नवले यांनी राजीनामा दिल्यानंतर उपसरपंच असलेल्या तुषार नवले यांची प्रभारी सरपंच म्हणून ठराविक कालावधीसाठी निवड करण्यात आली होती. त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर सरपंच पदाची निवडणूक लावण्याची ग्रामपंचायत सदस्य आणि अधिकारी यांनी तयारी केली. त्याच अनुषंगाने आज (दि. १८.१०.२०२४ ) रोजी वृषाली प्रशांत गवारे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी संजीव पुंडलीक साळवे यांनी केली. वृषाली प्रशांत गवारे यांना मिळालेल्या पदामुळे ग्रामस्थांकडून शुभेच्छाचा वर्षाव केला जात आहे.

यावेळी ग्रामविकास अधिकारी किसन बिबे, गावकामगार तलाठी रवींद्र जाधव, उपसरपंच नवले तुषार प्रकाश, निर्मला शुभम नवले, नवले संदीप विश्वास, कोहोकडे अजित प्रल्हाद, नवले सोनाली विकास, तळेकर शहाजी पोपट, फलके तेजस गणपत, शेलार नागेश सर्जेराव, कोहोकडे जयश्री रामदास, जगताप हौसाबाई लाला इत्यादी ग्रामपंचायत सदस्य १३ पैकी ११ व ग्रामस्थ उपस्थित होते.



## हर्षवर्धन पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या संसदीय मंडळामध्ये नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या संसदीय मंडळामध्ये (पार्लमेंटरी बोर्ड) शुक्रवारी (दि.१८) नियुक्ती करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या संसदीय मंडळामध्ये (पार्लमेंटरी बोर्ड) मध्ये प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात येत आहे,असे पक्षाचे सरचिटणीस रवींद्र पवार यांनी हर्षवर्धन पाटील यांना आज शुक्रवारी दि.१८ पत्राद्वारे कळविले आहे. पक्षाची संसदीय मंडळाची बैठक मुंबईत शनिवारी दि.१९ होत आहे.




राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील,खा. सुप्रियाताई सुळे यांनी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या संसदीय मंडळावर निवड केल्याने इंदापूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला.

# वयाच्या ८५ व्या.वर्षी श्रीमती रंगुबाई बोडखे यांची अध्यात्मनिष्ठा कायम

## कोजागिरीनिमित्त माहेरच्या भोन्याई देवीची मनःपूर्वक केली पूजा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

वयाच्या ८५ व्या.वर्षीसुद्धा आणि विशेष म्हणजे दोन महिन्यापुर्वी अत्यंत क्रिटिकल शस्त्रक्रिया होऊ नये प्रचंड अध्यात्म निष्ठेच्या जोरावर कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने माहेरच्या आष्टी या गावी देवीची मनःपूर्वक पूजा करून समाधान मानणाऱ्या श्रीमती रंगुबाई लक्ष्मणराव बोडखे यांच्या अध्यात्म निष्ठेविषयी विशेष कौतुकाने पाहिले जात आहेत.



महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे येथील शहर गाव वाड्यावर त्यासह तांड्यावर अत्यंत पवित्र भावनेने अध्यात्मक दृष्टिकोनातून विविध देवदेवतांची मनोभावे पूजा केली जाते.केवळ निष्ठेमुळे इच्छाशक्ती आणि आत्मविश्वास वाढतो. महिला वर्गातून परमार्थ भक्तीची ओढ अधिक दिसून येते.बीड जिल्ह्याच्या आष्टी येथील जेष्ठ पत्रकार तथा झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे यांच्या आई श्रीमती रंगुबाई लक्ष्मणराव बोडखे या ८५ वर्षाच्या आहेत.त्यांची दोन महिन्यापूर्वी मोठी शस्त्रक्रिया पार पडली. सर्वांच्या आशीर्वादाने त्या सध्या आनंदी जीवन जगत आहेत.अनेकांनी शस्त्रक्रियेनंतर त्यांची प्रत्यक्ष बोडखे यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांना सदिच्छा देत आहेत.

रंगुबाई बोडखे यांनी काल कोजागिरी पौर्णिमेच्यानिमित्ताने आपल्या माहेरच्या गावी जाऊन तेथील भोन्याई या देवीची पूजा अत्यंत मनोभावे केली.इतक्या वृद्ध अवस्थेत सुद्धा ईश्वरावर श्रद्धा असल्यानंतर मनुष्य अत्यंत श्रद्धा भावभक्तीने देवाच्या चरणी नतमस्तक होऊन आनंदी आणि समाधानाची जीवन जगू शकतो हे यानिमित्ताने श्रीमती रंगुबाई बोडखे यांच्या या अध्यात्म निष्ठेने आधोरेखीत केले आहे.

## महाविकास आघाडीच गुजरातची ब्रँड म्बेसेडर

# ज्यांचा गृहमंत्रीच तुरुंगात गेला,तेच आता आरोप करताहेत-देवेंद्र फडणवीसांचा पलटवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील महाविकास आघाडीतील नेते गुजरात राज्याचे ब्रँड म्बेसेडर असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. सध्या देशात महाराष्ट्र नंबर एकचे राज्य असून देखील महाविकास आघाडीचे नेते गुजरातचे गुणगान गात आहेत. या माध्यमातून ते महाराष्ट्राला कमी लेखत असल्याचा आरोप त्यांनी केला. इतकेच नाही तर गृहमंत्रालयावर होत असलेल्या आरोपांवर देखील त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ज्यांचा गृहमंत्री स्वतः जेलमध्ये गेला, तेच आता आरोप करत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. राज्यातील स्थगिती सरकार गेल्यानंतर आता राज्यात गतिशील सरकार आले असल्याचा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.



आमच्यासाठी निवडणुकीचा शंखानाद झाला आहे. मात्र विरोधकांसाठी ते ऐलान असल्याचा टोला देखील फडणवीस यांनी लगावला आहे. आम्ही परिवर्तन करणाऱ्या योजना आणल्या असल्याचा दावा देखील फडणवीस यांनी केला आहे. शेतकऱ्यांसाठी सौर ऊर्जेची योजना आणणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ३६५ दिवस दिवसा वीज उपलब्ध करून देणार असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. ही केवळ घोषणा नाही. तर याचे प्रत्यक्ष काम जमिनीवर सुरू केले असल्याचे देखील ते म्हणाले. साडेआठ रुपयांना पडणारी वीज आता तीन रुपयाला पडणार असल्याचे देखील फडणवीस यांनी म्हटले आहे. यातून राज्य सरकारचा मोठ्या प्रमाणात पैसा देखील वाचणार असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे.राज्यातील कायदा व्यवस्थे संदर्भात देखील गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. राज्य सरकारने कोणतेही घटना घडल्यानंतर तात्काळ कारवाई केली असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. मात्र, ज्यांचे गृहमंत्री स्वतः जेलमध्ये गेले. ते आता राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेवर बोलत असल्याचा खोचक टोला देखील त्यांनी लगावला. यावेळी त्यांनी राज्यात महाविकास आघाडी सरकारच्या म्हणजेच उद्धव ठाकरे सरकारच्या काळात घडलेल्या अनेक गुन्हेगारी संदर्भातील घटनांचा उल्लेख केला. आता देखील काही घटना घडल्या आहेत. मात्र तात्काळ कारवाई केली गेली असल्याचा दावा त्यांनी केला.

# व्यापाऱ्यांना ठामपणे संरक्षण देण्याचं काम मी केले कुणी कितीही वल्गना करुद्या कितीही समोर येऊ द्या

## जो पर्यंत सर्वसामान्य माणूस माझ्या सोबत आहे मी तोपर्यंत मी कुणालाच घाबरत नाही-सुरेश धस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**





माझ्याकडे या मतदार संघाचा डेवोलपमेंट प्लॅन आहे सुजलाम सुफलाम हा मतदार संघ करण्याचा माझा पहिल्या पासून माणसं आहे.तुम्ही संधी दिल्यास हे सर्व मी करून दाखविणार आहे.कुणी कितीही वल्गना करुद्या कितीही समोर येऊद्या जो पर्यंत गोरगरीब,सर्वसामान्य जनता माझ्या सोबत आहे मी तोपर्यंत मी कुणालाच घाबरत नाही म्हणत आ.सुरेश धस यांनी आगामी विधानसभा निवडणूक लढविण्याबाबत स्पष्ट संकेत दिले आहेत.गुरुवारी शहरातील मोरेश्वर लॉन येथे आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यातील व्यापारी बांधवांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष संजय मेहेर शिरूर नगराध्यक्ष रोहिदास पाटील,मधुसूदन खेडकर,डॉ.बडजाते,अभिजीत डूगरवाल,फैयाज भाई,अशोक तळेकर,गोरख कर्डिले,संतोष भंडारी,संपत शेळके,नागेश कर्डिले,हरून शेठ,शहादुला बेग,हेमंत पोखरणा,योगेश भंडारी,दर्शन कांकरिया,रतिलाल कटारिया,कल्याण भोसले,अजित बोरा यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना धस म्हणाले की,ज्या वेळी कडा बाजारपेठ माझ्या ताब्यात आली त्या वेळी साधं पोताड्याच हॉटेल असणार कडा मार्केट आज त्या मार्केटचा कांदा दुबईला जात आहे.परळी येथे खत साठा करायचे रॅक होते.ते अहील्यानगराला आणण्याचे काम मी केले.त्यामुळे वाहतूक कमी होऊन व्यापाऱ्यांना ते सोयीस्कर मिळण्यास मदत झाली.खताचा पुरवठा वारंवार आपल्याला कमी मिळत होता त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत राहून तो पुरवठा व्यवस्थित करण्यासाठी प्रयत्न केला.आज एकही कृषी दुकानदाराची खताच्या कमतरतेबाबत तक्रार नाही.व्यापाऱ्यांमध्ये किमान ८ दिवसातून एकदा बसून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतो त्याच निरसन करण्याचं काम करतो.आयुष्यात मदत करताना कधीच हिशोबाची डायरी ठेवली नाही.म्हणूनच लाखोंनी माणसं जोडत गेली.ती आजही सत्ता असो अथवा नसो ती कायम माझ्यासोबत आहेत हीच माझी संपत्ती असल्याचे सांगत मच्छिंद्रनाथ गडावर २१ कोटी रुपयांची विकास काम सुरू आहे.त्याचा कायापालट करण्याचं काम मी केलं.देवस्थानाला १९ एकर जमीन होती आता १५० एकर जमीन झाली.आष्टी तालुक्यात सव्वादोन टीएमसी पाणी मी आणून दाखविले आहे.वेळ आली की ते पुराव्यासह तुमच्यासमोर सिध्द करून दाखवणार आहे.५८ टी एम सी जे पाणी आलेलं आहे ते भविष्यामध्ये पाटोदा आणि शिरूर तालुक्याला वळवणार हा प्रामाणिकपणे शब्द तुम्हाला देतो म्हणत माझा मोबाईल दिवस रात्र माझ्या जवळ असतो कारण कधी कुणाची काय अडचण असेल ती सांगता येत नाही परंतु एक सांगतो ज्या दिवशी मोबाईल बंद करील हॉल मध्ये ठेवीन त्या दिवशी मी माझ राजकारण बंद करीन.रात्रंदिवस झटाव लागतं तेव्हा माणसं जमतात.स्वतःच्या स्वार्थासाठी काही जण जातीपातीचे राजकारण करू पाहत आहेत ही जनता माझ्या पाठीशी आहे तो पर्यंत मी कशालाच घाबरत नाही असे शेवटी धस म्हणाले.यावेळी हजारो व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रब्बी हंगामासाठी पाणीपाळी सोडण्याचे नियोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) नांदेड या विभागांतर्गत असणाऱ्या निम्न मानार मोठा प्रकल्प, उर्ध्व मानार मध्यम प्रकल्प, करडखेड मध्यम प्रकल्प, कुंद्राळा मध्यम प्रकल्प, पेठवडज मध्यम प्रकल्प, महालिंगी मध्यम प्रकल्प, कुदळा मध्यम प्रकल्प, १ कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा व ५० लघु प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांना कळविण्यात आले आहे की, सदर नमूद प्रकल्पांवर रब्बी हंगाम सन २०२४-२०२५ राबविण्याचे नियोजित आहे.

सर्व धरणांत १५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या स्थितीनुसार पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असून, उपलब्ध पाणी साठ्याच्या अनुषंगाने प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात रब्बी हंगाम पूर्ण क्षमतेने राबविण्याचे नियोजित आहे. सदर नियोजनास आवश्यकतेनुरुप कालवा सल्लागार समितीची मंजूरी मिळाल्यानंतर त्याप्रमाणे पाणीपाळी सोडण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्यानुषंगाने सर्व संबंधित लाभधारकांना आवाहन करण्यात येते की, हंगाम सुरू होण्यापूर्वी खालील अटी व शर्तींची पूर्तता करावी.

रब्बी हंगामी, दुहंगामी व इतर बारमाही पिकांसाठी कालव्याचे प्रवाही/ मंजूर उपसा/ मंजूर जलाशय उपसा व मंजूर नदी, नाले उपसा सिंचनासाठी ज्यांना पाणी घ्यावयाचे आहे त्यांनी आपले पाणी मागणी अर्ज विहीत नमुन्यात (नमुना नबंर ७) दि.३१ ऑक्टोबर २०२४ पूर्वी संबंधित शाखा कार्यालयात माहिती भरून सादर करावेत. पिकांचे मागणी क्षेत्र २० आरच्या पटीत असावे. कालवा संचलन कार्यक्रमानुसारच पाणी घेणे बंधनकारक राहील. पाणीपट्टी नभरणाऱ्या व पाणी अर्ज नामंजूर असलेल्या लाभधारकास सिंचनासाठी पाणी देणे या कार्यालयास बंधनकारक राहणार नाही. काही अपरिहार्य



कारणास्तव किंवा तांत्रिक कारणास्तव पाणी पुरवठा करणे शक्य न झाल्यास होणाऱ्या नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. लाभधारकांनी दिवस व रात्रीच्या वेळेस पाणी घेणे बंधनकारक आहे. रात्रीच्या वेळेस पाणी न घेतल्यामुळे पाणी नदीनाल्यास वाया जाऊन ठराविक मुदतीत पाणी न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. दि.२९ मार्च २०२२ च्या शासन निर्णयातील प्रचलित दरानुसार पाणीपट्टीचे दर आकारण्यात येतील. थकीत व चालू पाणीपट्टी वेळेत भरुन सहकार्य करावे.शेतचारी स्वच्छ व दुरुस्त ठेवण्याची जबाबदारी संबंधित लाभधारकांची राहील. उडाप्याच्या अंतिम क्षेत्रास पाणी पुरवठा करणे बंधनकारक राहणार नाही. पाणीपाळी सुरू असताना जबरदस्तीने अथवा विनापरवानगी विद्युत मोटारी, ट्रॅक्टर द्वारे पाणी उपसा केल्यास अथवा गेट उघडल्यास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. जे लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करण्यात आले आहे त्या लाभक्षेत्रावर नियमानुसार पाणी मागणी, वसूली आणि सिंचनाचे नियंत्रण पाणी वापर संस्थेने करावे. अन्यथा पाणी पुरवठा केला जाणार नाही, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग (द) चे कार्यकारी अभियंता आ. शि. चौगले यांनी केले आहे.

### दानापूर परिसरामध्ये अवकाळी पावसाचा कहर

# अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे करण्यात यावे-अनिल शिंदे उपसरपंच



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यात तील दानापूर परिसरामध्ये मुसळधार पावसामुळे झालेली शेतकऱ्यांची नुकसान मक्का सोयाबीन कापूस पिकांचे नुकसान झालेले आहे शेतामध्ये या अवकाळी पावसामुळे तळे साचलेले आहे आईन दिवाळीच्या सणासुदीमध्ये तोंडात आलेला घास या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे.

**या अवकाळी पावसामुळे कपाशीचे पीक जमीन दोस्त झालेले आहे शेतकरी जगाचा पोशिंदा आहे आपला उदारनिर्वाह करून इतरांचा उदरनिर्वाह करणारा शेतकरी या अवकाळी पावसामुळे मक्का सोयाबीन कापूस या पिकांचे या अवकाळी पावसामुळे अतोनात नुकसान झालेले आहे तरी ज्या ज्या शेतकऱ्यांची नुकसान झालेली आहे त्यांचे पंचनामे करण्यात यावे**

**-शिवाजी एकनाथ दळवी**

**या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान या हंगामामध्ये जसं पहा तसं अवरेज मिळालेले नाही म्हणून माझी दार मदार रब्बी पिकावर होती पण या अवकाळी पावसामुळे विहीर खसुन गेलेली आहे. ज्या ज्या शेतकऱ्यांची नुकसान झालेली आहे त्यांचे पंचनामे करण्यात यावी**

**-शेतकरी सुरेश शिंदे**

## दर्पण पत्रकार संघ व यूट्यूब चैनल चे पत्रकार व साप्ताहिक पत्रकार संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडे केली तक्रार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

उमरखेड दि.१७ ऑक्टोंबर २०२४ रोजी दुपारी साडेतीन वाजता आदर्श आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर उमरखेड शहरासहित विविध ठिकाणी विविध राजकीय बॅनर काढले गेले नाही जवळपास दोन दिवस उलटून सुद्धा १७. १०. २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत उमरखेड ते ढाणकी रोडवरील विविध पक्षाचे बॅनर जसेच्या तसे पाहायला मिळत होते नवनियुक्त उप माहिती अधिकारी कार्यालय येथील कर्मचारी यांनी शासनाकडे योग्य ती माहिती न पुरवल्यामुळे आपल्या कर्तव्यात कसूर ठेवून काम करत असल्यामुळे त्यांचीहकालपट्टी करण्यात यावी या आशियाची निवेदन महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे तसेच यवतमाळ जिल्हाधिकारी यांनी योग्य ती चौकशी करून दोशी विरुद्ध कारवाई करून पत्रकारांना न्याय देण्यात यावा यामध्ये ज्येष्ठ पत्रकार विलास चव्हाण दर्पण पत्रकार संघाचे अध्यक्ष निसार सचिव सतीश कोल्हे पत्रकार डॉ. आंबेजोगाईकर पत्रकार डॉ.आयुब भाई पठाण पत्रकार चुनुमियाँ काझी पत्रकार सुभाष वाघाडे पत्रकार भीम टायगर सेनेचे कार्याध्यक्ष श्याम धुळे दिलीप मुनेश्वर विजय कदम परिमल चिंचोलकर पत्रकार सय्यद रहीम रजा शेख जमीर आदी पत्रकारांनी दिले निवेदन जाणून घेऊया ज्येष्ठ पत्रकार विलास चव्हाण यांची प्रतिक्रिया सर्व पत्रकार उपस्थित होते.

## मतदान प्रक्रियेत मतदारांनी १००% प्रतिसाद नोंदवावा-निवडणूक निर्णय अधिकारी अनुप पाटील यांचे आवाहन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

राज्यात सर्वत्र निवडणुकीचा बिगुल वाजला असून या संदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी दुपारी साडेतीन वाजता पत्रकार परिषद घेऊन विधानसभा निवडणूक जाहीर केली आहे. त्यामुळे राजकीय पक्षाचे पदाधिकारी प्रमुख शासकीय अधिकारी कर्मचारी व जनतेनी आदर्श आचारसंहितेचे नियम काटेकोरपणे पालन करावे अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे आवाहन ९१- मुखेड विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी अनुप पाटील यांनी दुपारी तहसील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत केले. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजेश जाधव, नायब तहसीलदार गोपनर आदी उपस्थित होते. यावेळी बोलतांना ९१- मुखेड विधानसभा निवडणूक निर्णय - अधिकारी अनुप पाटील यांनी महाराष्ट्रत विधानसभा निवडणुकीची आचार संहिता लागू झाली असून महाराष्ट्रात एकाच. टप्प्यात मतदान होणार आहे. २२ ते २९ ऑक्टोबर ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटी तारीख आहे, ३० ऑक्टोबर रोजी अर्जाची छाननी होणार असून ४ नोव्होंबर रोजी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. २० नोव्होंबर रोजी मतदान तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. ९१- मुखेड विधानसभा मतदारसंघात एकुण मतदार संख्या ३ लक्ष ४५४६ ऐवढी आहे. त्यात पुरुष १ लाख ५८ हजार ४७०, महिला १ लाख ४६ हजार ०६८ ऐवढी आहे, तृतीयपंथी ०८ आहेत ६२१ सैनिक मतदार आहेत. एकुण मतदान केंद्र ३६६आहेत यासाठी मतदान अधिकारी आणि कर्मचारी १७०० लागणार आहेत.

# सोयाबीनची हमी भावाने खरेदी तात्काळ चालु करुन शेतकऱ्यांना २४ तासाच्या आत पैसे द्या

### नसता शेतकऱ्यांना सोबत घेऊन तिव्र आंदोलन करणार-भाई विष्णुपंत घोलप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

नवीन सोयाबीनची आवक एक महिन्यापासून बाजारात येत आहे. सोयाबिनचा शासनाचा हमीभाव ४८९२/- रुपये आहे, परंतु आज बाजारात सोयीबीनची खरेदी ३५००/- ते ४२००/- रुपये असुन या मुळे शेतकरी वर्गाला १ क्विंटलच्या मागे किमान १०००/- हजार रुपयाचे नुकसान सोसावे लागत आहे. शासनाने १५ ऑक्टोबर- २०२४ ला खरेदी केंद्र चालु करु म्हणून घोषणा केलेली असुन आता शेतकऱ्यांची सोयाबीन नोंदणी चालु केलेली आहे. शासनाने शेतकऱ्याचा विचार न करता सोयाबीन प्लांट (कंपनी) चा विचार केलेला असुन सोया तेल आणि सोया पेंड कंपनीला १०००/- रुपयाच्या फरकाने सोयाबीन कमी भावात मिळत आहे. तसेच शेतकऱ्यांची सोयाबीन हमीभावाने खरेदी केल्या नंतर किमान



२४ तासाच्या आत पैसे शेतकऱ्यांना मिळावेत, शेतकऱ्यांना सोयाबीन तयार करतांना बियाणे, रासायनिक खते, ट्रॅक्टरचा खर्च, खुरपणी किंवा डुबे चालविणे, फवारणी, काढणी व मळणी या साठी रोख पैसे द्यावे लागत आहे. त्या साठी शासनाने सोयाबीनचे हमी भावाने खरेदी केंद्र तात्काळ चालु करुन २४ तासाच्या आत शेतकऱ्यांना पैसे द्यावेत नसता भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाखाली शेतकरी बांधवांना सोबत घेऊन तिव्र आंदोलन करतील याची शासनाने गांर्भीयाने नोंद घ्यावी. असे लेखी निवेदनाव्दारे उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांना कळविले आहे. माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.धनंजयजी मुंडे व भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीडचे खासदार मा.बजरंग(बप्पा) सोनवणे यांना कळविले आहे.

# दक्षिण नांदेड विधानसभेची यज्ञकांत कोल्हे यांनी जरांगे पाटील यांच्या कडे केली मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

भायेगाव येथील मराठा सेवक यज्ञकांत कोल्हे पाटील भायेगावकर यांनी मराठा योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या कडे नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातून तिकीट देण्यात यावे अशी मागणी केली आहे.यज्ञकांत कोल्हे हे प्रेरक संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष असून वाहन चालक आहेत.त्यांनी मराठा समाजासाठी भायेगाव व नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातून आंदोलन करून मनोज दादा जरांगे पाटील यांना वेळोवेळी पाठींबा दिला आहे.काल त्यांनी जरांगे पाटील यांची भेट घेऊन तिकीटाची मागणी केली आहे.असे त्यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले आहे.



# युवक-युवतींनी मतदानाचा उत्सव साजरा करावा-तहसीलदार प्रविण पांडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

लोकशाहीमध्ये मतदान करणे हा आपला हक्क व कर्तव्य आहे. विशेषतः युवक-युवतीनी भरभरून मतदान करणे व इतर पात्र मतदारांना मतदानास प्रेरित करणे हे त्यांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. युवक हे राष्ट्राचे खरे शिल्पकार आहेत. एक एक मत राष्ट्र घडवण्यास आवश्यक असते. याच उद्देशाने युवक-युवतीनी येत्या विधानसभा व लोकसभेच्या पोट निवडणुकीत उत्साहाने मतदान करुन लोकशाहीचा हा उत्सव साजरा करावा, असे प्रतिपादन तहसीलदार प्रविण पांडे यांनी केले.

आज नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातून मतदार युवकांसाठी ०८७ नांदेड दक्षिण स्वीप कक्षाच्यावतीने मतदान जनजागृतीची सुरुवात निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ आणि नायब तहसीलदार नितेशकुमार बोलेलू यांच्या प्रेरणेतून झाली. जवळपास तीनशे मतदार युवकांना मतदानाचे महत्त्व उपप्राचार्या प्रा.कल्पना कदम यांनी विशद केले. प्रा.अनंतराव कौसडीकर यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात राजेश कुलकर्णी यांनी मतदाराच्या प्रतिज्ञेतून केली. नवमतदार युवक युवतींनी आपल्या परिसरातील मतदारांच्या भेटी घेवून मतदान करण्याची गरज व आवश्यकता पटवून देवून मतदान करावेच, असे सांगावे या बाबींचा उल्लेख स्वीप सदस्य संजय भालके यांनी आपल्या आभार प्रदर्शनातून व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.जी.कुलकर्णी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.एम.वाय.कुलकर्णी, लोक प्रशासन विभाग प्रमुख प्रा. अनंतराव कौसडीकर, बालासाहेब कच्छवे, सारिका आचमे,एस.व्हि.भालके, सुनील मुत्तेपवार, शिवराज पवार, लोक प्रशासन अभ्यास मंडळाचे डॉ. शेख हनीफ, करीयर कट्टा चे समन्वयक डॉ संतोष शेंबाळे, लोक प्रशासन विभागातील डॉ. विजय तरोडे, डॉ. सुरेश गजभारे, प्रा. शशिकांत रामगिरवार, प्रा. शिवानंद साखरे, डॉ. निलंगेकर शरणकुमार यांनी विशेष परिश्रम घेतले.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904